# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
# Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University

सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)

ईमेल : dbee@sus.ac.in ✆ : ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३०० संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०

◉ परीक्षा व मूल्यमापन मंडळ ◉ Board of Examinations and Evaluation ◉


जावक क्र. : पुअहोसोवि/पवमूमं/ 432
Ref. No. : PAHSU/BOEE/

दिनांक :
Date : 16 FEB 2024

## परिपत्रक 08

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या मार्च-२०२३ च्या विविध विद्याशाखेच्या अभ्यासक्रमामध्ये अंतिम परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या व पदवी, पदविका प्रमाणपत्र घेण्यासाठी पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांची माहिती/डाटा संगणक विभागाकडून प्राप्त झाल्याप्रमाणे प्रस्तुत विद्यापीठाच्या संकेतस्थळावर Convocation या मथळयाखाली पात्र विद्यार्थ्यांची नावे प्रसिद्ध करण्यात आली आहे.

त्याअनुषंगाने सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, १९व्या दीक्षांत समारंभात उपस्थित राहून पदवी प्रमाणपत्र स्विकारणाऱ्या विद्यार्थ्याची यादी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली असून पदवी प्रमाणपत्र स्विकारताना विद्यार्थ्याकडे Degree Code असणे आवश्यक आहे. सदरील Degree Code ची यादी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. दीक्षांत समारंभादिवशी पदवी प्रमाणपत्र घेण्यासाठी उपस्थित न राहणाऱ्या विद्यार्थ्यांची पदवी प्रमाणपत्रे दीक्षांत समारंभानंतर जलद टपालाने दिलेल्या पत्यावर पाठविण्यात येतील. तसेच मार्च- २०२३ मध्ये उत्तीर्ण होऊन पदवी प्रमाणपत्र घेण्यासाठी पात्र असूनही सदरील यादी मध्ये नाव नसणाऱ्या विद्यार्थ्यांनी विहित नमुन्यात योग्य ते कागदपत्रे जोडुन माहे मार्च- २०२४ अखेरपर्यंत ऑफलाईन पद्धतीने अर्ज करणे आवश्यक आहे. सदरील अर्ज विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तरी, संबंधीत सर्व विद्यार्थ्यांनी कृपया याची नोंद घ्यावी ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

(डॉ. म.स.रोकडे)
प्र.संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University
सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
ईमेल : dbee@sus.ac.in ✆: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३०० संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०
परीक्षा व मूल्यमापन मंडळ ◉ Board of Examinations and Evaluation

जावक क्र. : पुअहोसोवि/पवमूमं/
Ref. No. : PAHSU/BOEE/ 414

दिनांक :
Date : 15 FEB 2024

संदर्भ- १) विश्वविद्यालय अनुदान आयोग नवी दिल्ली यांचे पत्र क्र. D.O, No.F.9-7/2018(CPP-II) Date- 16 January 2024
2) दि. १६ जानेवारी, २०२४ रोजीच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीचा ठराव क्र. २

## परिपत्रक - 07

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या शैक्षणिक सत्र २०२३-२४ च्या विविध पदवी, पदवीका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना सुवर्णपदके, विद्यावाचस्पती पदवी तसेच पदवी, पदविका प्रमाणपत्र प्रदान करण्याच्या अनुषंगाने विद्यापीठाचा एकोणीसावा दीक्षांत समारंभ दिनांक २१ फेब्रुवारी, २०२४ रोजी आयोजित करण्यात आला आहे.

त्याअनुषंगाने प्रस्तुत विद्यापीठाच्या सलंग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य व सर्व संकुलाचे विभाग प्रमुख, पदव्युत्तर शैक्षणिक विभाग यांना कळविण्यात येते की, विद्यावाचस्पती पदवी व सुवर्णपदके प्राप्त विद्यार्थ्यांनी तसेच इतर उपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यांनी दीक्षांत समारंभादिवशी पांढऱ्या रंगाचा पोशाख परिधान करुन उपस्थित राहण्याबाबत आपल्या स्तरावरुन सूचना द्याव्यात.

कृपया याची नोंद घ्यावी.

कळावे,

आपला विश्वासू,

(डॉ. म.स.रोकडे)
प्र.संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत माहितीस्तव व पुढील कार्यवाहीसाठी :-
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये/ विद्यापीठ संकुले
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

सर्व विद्यार्थ्यांना व संबंधितांना सदरचे परिपत्रक निदर्शनास आणून द्यावे.